# सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय

**नविन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, पुणे-४११००१**

**दूरध्वनी क्र.: २६१२२८४६/४७** **Email - commcoop2011@gmail.com**

जा.क्र.सआ-४/वैधा.कार्य/लवाद नामतालिका/२०२२-२५/३२८ /२०२१ दि.१६/११/२०२१

प्रति,

विभागीय सहनिबंधक,

सहकारी संस्था,

**विषय :- बहुराज्यीय सहकारी संस्था अधिनियम २००२ चे कलम ८४(४) अन्वये सन २०२२ ते २०२५ या कालवधीसाठीचे लवाद नामतालिकेवर लवाद (Arbitrator) यांची नेमणूक करणेबाबत.**

संदर्भ :- या कार्यालयाचे जा.क्र.४-सआ/कायदा/लवानामतालिका१९-२२/२०१८/८७६, दि. २६/१०/२०१८चे पत्र.

उपरोक्त संदर्भिय पत्राकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

केंद्र शासनाच्या अधिसूचना दि. २४ फेब्रुवारी २००३ चे अन्वये बहुराज्यीय सहकारी संस्था अधिनियम २००२ चे कलम ८४(४) अन्वये लवाद (Arbitrator) नेमणूक करण्याचे अधिकार हे संबंधित राज्याच्या निबंधकांना देण्यात आले आहेत. त्यास अनुसरुन या कार्यालयाचे दि. २६/१०/२०१८ चे पत्रान्वये सन २०१९ ते २०२२ या कालावधी साठी लवाद (Arbitrator) पॅनल तयार करण्यात आले होते. सदर पॅनलचा कालावधी दि. ३१/३/२०२२ अखेर संपुष्टात येत आहे.

बहुराज्यीय सहकारी संस्था अधिनियम २००२ चे कलम ८४(४) अन्वये सन २०२२ ते २०२५ या कालवधीसाठीचे लवाद (Arbitrator) म्हणून नेमणूकीसाठी पात्रतेच्याअटी पुढील प्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

१. सर्व न्यायालयीतील निवृत्त न्यायाधीश व सेवानिवृत्त विधी अधिकारी
२. प्रॅक्टिसींग ॲडव्होकेटस
३. चार्टर्ड अकौंन्टंट, कॉस्ट अकौन्टंट
४. राष्ट्रीयकृत बँका, ग्रामिण बँका, भुविकास बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, व्यापारी बँका, नागरी सहकारी बँका, राज्य सहकारी बँक यांचे सेवेतील व्यवस्थापक दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेले सेवानिवृत्त अधिकारी (ज्यांना सेवानवृत्त होऊन दोन वर्षापेक्षा कमी कालावधी झालेला आहे.)
५. सहकारी विभागातील उपनिबंधक दर्जापेक्षा वरच्या दर्जाचे सेवानिवृत्त अधिकारी (ज्यांना सेवानिववृत्त होऊन दोन वर्षापेक्षा कमी कालावधी झालेला आहे.)

**तसेच अशा व्यक्तींची नियुक्ती करताना उक्त अधिनियमामध्ये नमुद नसले तरीही खालीलप्रमाणे जादा अर्हता / पात्रता असाव्यात-**

६. त्यांचेवर कोणत्याही स्वरुपाचे गुन्हे दाखल नसावेत.
७. शासकीय /बँक सेवेतील सेवानिवृत्त अधिकारी यांची कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू नसावी व सेवेत कोणताही ठपका ठेवलेला नसावा.
८. अशी व्यक्ती कोणत्याही काळया यादी (Black List) मध्ये समाविष्ठ नसावी.

९. सदर व्यक्ती संबंधित विभागाच्या विभागीय सहकारी सहनिबंधक, सहकारी संस्था कार्यालयाच्या अधिपत्याखाली येणाऱ्या जिल्हयातील रहिवासी असावी.

१०. सदर व्यक्ती एकावेळी एकाच विभागातून अर्ज दाखल करु शकते.

लवाद तालिका तयार करणेची बाब राज्य निबंधकांच्या अखत्यारीतील असल्यामुळे लवाद नामतालिका तयार करण्याचा कार्यक्रम व त्यानुसार ऑफलाईन पध्दतीने विभाग स्तरावर अर्ज मागणी व स्विकृती आणि छाननी संबंधीत विभागीय सहनिबंधक यांचे स्तरवर करावयाची आहे. विभागांकडील तालिका संयुक्त व रारज्य स्तराची प्रारुप व अंतिम तालिका मुख्यालयाकडून प्रसिध्द करण्यात येईल.

**लवाद नामतालिकेचा कालवधी-**

**सन २०२२ ते २०२५ (१/४/२०२२ ते ३१/३/२०२५) असा तीन वर्षासाठी असेल.**

**पुरवणी यादी**

अंतिम यादी प्रसिध्द झाल्यानंतर येणाऱ्या अर्जाचा पात्रतेनुसार पुरवणीयादीसाठी विचार करण्यात यावा. ऑक्टोबर ते डिसेंबर या कालावधी प्राप्त झालेले अर्ज पुढील वर्षाच्या पूरवणी यादीसाठी घेण्यात यावेत. पूरवणी यादीचा कालावधी नामतालिकेच्या कालावधीत म्हणजे दि. ३१/३/२०२५ पर्यंत समजण्यात यावा.

**जाहिर निवेदन -**

सर्व विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था यांनी प्रसिध्द करावयाचे जाहिर निवेदनाचा नमुना सोबत जोडला आहे.

सन २०२२-२०२५ (१-४-२०२२ ते ३१-३-२०२५) या कालावधीची लवाद नामतालिका तयार करणेसाठी संबंधित विभागांनी त्यांचे स्तरावरुन लोकप्रिय वृत्तपत्रामधुन व्यापक जाहिरात/ प्रसिध्द करावयाची आहे. त्यासाठीचा नियोजित कार्यक्रम पुढीलप्रमाणे राहील-

**लवाद नामतालिका तयार करणेबाबतचे नियोजित वेळापत्रक**

| अ.क्र. | नामिलिका तयार करणेबाबतचे मुद्ये | दिनांक |
|---|---|---|
| १ | जाहिरात प्रसिध्द करणे | १/१२/२०२१ |
| २ | अर्ज सादर करणेची अंतिम मुदत | १/१२/२०२१ ते ३१/१२/२०२१ |
| ३ | अर्जाची छाननी | १/१/२०२२ ते ३१/१/२०२२ |
| ४ | प्रारुप नामतालीका प्रसिध्द करणे | १४/२/२०२२ |
| ५ | प्रारुप नामतालिकेवर हरकती मागविणेचा अंतिम दिनांक | १४/२/२०२२ ते २१/२/२०२२ |
| ६ | प्राप्त हरकतींवर निर्णय घेण्याचा अंतिम दिनांक | ११/३/२०२२ |
| ७ | अंतिम लवाद तालिका प्रसिध्द करणे | १८/३/२०२२ |

प्रसिध्द करण्यात येणाऱ्या जाहिरातीचे कात्रण मुख्यालयास सदर करण्यात यावे. विभागांनी त्यांचेकडील प्राप्त सर्व अर्जांची छाननी दि. ३१/१/२०२२ पर्यंत करावाची असून विभागनिहाय लवाद नामतालिका Soft Copy व Hard Copy च्या स्वरुपात दि.७/२/२०२२ पर्यंत अर्जदारांचे मुळ अर्जासह मुख्यालयास सादर करावयाच्या आहेत. सदर प्रकरणी एकत्रित प्रारुप व अंतिम यादी मुख्यालय स्तरावरुन प्रसिध्द करण्यात येईल व प्रसिध्दीसाठी सर्व विभागीय सहनिबंधक कार्यालयांना पाठविण्यात येईल.

(अनिल कवडे)
सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

## जाहिर निवेदन

विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, ------------------ यांचे कडून कळविण्यात येते की, बहूराज्यीय सहकारी संस्था अधिनियम, २००२ चे कलम ८४(४) अन्वये सन २०२२-२०२५ या कालावधीसाठी लवाद नामतालिका (Arbitrator Panel) तयार करणेसाठी खालील व्यक्तींकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

१. सर्व न्यायालयातील निवृत्त व सेवानिवृत्त विधी अधिकारी
२. प्रॅक्टीसिंग अॅडव्होकेटस
३. चार्टर्ड अकौन्टंट, कॉस्ट अकौन्टंट
४. राष्टीय बँका, ग्रामिण बँका, भूविकास बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, व्यापारी बँका, नागरी सहकारी बँका, राज्य सहकारी बँका यांचे सेवेतील व्यवस्थापक दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेले सेवानिवृत्त अधिकारी (ज्यांना सेवानिवृत्त होऊन दोन वर्षापेक्षा कमी कालावधी झालेला आहे.)
५. सहकार विभागातील उपनिबंधक दर्जापेक्षा वरच्या दर्जाचे सेवानिवृत्त अधिकारी (ज्यांना सेवानिवृत्त होऊन दोन वर्षापेक्षा कमी कालावधी झालेला आहे.)

**तसेच अशा व्यक्तींची नियुक्ती करताना उक्त अधिनियमामध्ये नमूद नसलेले तरी खालीप्रमाणे जादा अर्हता/पात्रता असाव्यात.-**

६. त्यांचेवर कोणत्याही स्वरुपाचे गुन्हे दाखल नसावे.
७. शासकीय / बँक सेवेतील सेवानिवृत्त अधिकारी यांची कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू नसावी व सेवेत कोणताही ठपका ठेवलेला नसावा.
८. अशी व्यक्ती कोणत्याही काळया यादीत (Black List) मध्ये समाविष्ठ नसावी.
९. सदर व्यक्ती संबंधित विभागाच्या विभागीय सहकारी सहनिबंधक, सहकारी संस्था कार्यालयाच्या अधिपत्याखाली येणाऱ्या जिल्हयातील रहिवासी असावी.
१०. सदर व्यक्ती एकावेळी एकाच विभागातून अर्ज दाखल करु शकते.

अर्जाचे विहित नमुने विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था ----- व पत्ता ------ यांचे कार्यालयात दिनांक १/१२/२०२१ ते ३१/१२/२०२१ या कालावधीत कार्यालयीन वेळेत मिळू शकतील. अर्ज सादर करणेची अंतिम मुदत दि. ३१/१२/२०२१ पर्यात राहिल. प्राप्त अर्जाची छाननी पूर्ण करुन दि. १४/२/२०२२ रोजी प्रारुप लवाद नामतालिका प्रसिध्द होईल. सदर प्रारुप नामतालिका यादी संबंधित विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था यांचे कार्यालयात लावण्यात येईल. प्रारुप नामतालिकेवर हरकती असल्यास vaidhanik8@gmail.com या इ-मेल वर पुराव्यासह हरकती दि. २१/२/२०२२ पर्यंत सादर कराव्यात. हरकतीचा निर्णय दि. ११/३/२०२२ रोजी करुन दि. १८/३/२०२२ रोजी अंतिम लवाद नामतालिका प्रसिध्द करण्यात येईल. याबाबतची जाहिर सूचना उपरोक्त नमूद कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

सही/-

विभागीय सहनिबंधक,
सकारी संस्था, ------------

**बहुराज्यीय सहकारी संस्था अधिनियम, २००२ चे कलम ८४(४) अन्वये सन २०२२-२०२५ या कालावधीसाठी लवाद नामतालिकेवर (Arbitrator's Panel) समावेश होण्यासाठीचा अर्ज.**

---

प्रति,

**विभागीय सहनिबंधक,**
**सहकारी संस्था,**

**विषय : बहुराज्यीय सहकारी संस्था अधिनियमण २००२ चे कलम ८४(४) अंतर्गत सन २०२२- २०२५ या कालावधीच्या लवाद नामतालिकेवर नावाचा समावेश होणेबाबत.**

**संदर्भ :- दै. मधील दिनांक रोजीची जाहिरात.**

उपरोक्त विषयास अनुसरुन सादर करण्यात येते की, बहुराज्यीय सहकारी संस्था अधिनियम, २००२ चे कलम ८४(४) अंतर्गत सन २०२२-२०२५ या कालावधीच्या लवाद नामतालिकेवर माझा समावेश होणेकरीता माझी वैयक्तीक माहिती खालीलप्रमाणे :-

१. अर्जदाराचे नाव :-

२. कायम पत्ता :- संपर्कासाठी पत्ता (कायम पत्त्यापेक्षा वेगळा असेल तर ) :-

-----------------------------------------------------

-----------------------------------------------------

३. जन्म तारीख :-

४. शैक्षणिक पात्रता :-

५. दूरध्वनी क्रमांक :-

६. भ्रमणध्वनी क्रमांक :-

७. ई मेल आयडी :-

८. आधार क्रमांक :-

९. अर्जदार हा :-

**अ) सेवानिवृत्त अधिकारी असल्यास** :- (सर्व न्यायालयातील निवृत्त न्यायाधीश व सेवानिवृत्त विधी अधिकारी, सहकार विभागातील सेवानिवृत्त उपनिबंधक दर्जापेक्षा कमी दजा नसलेले अधिकारी, राष्ट्रीयकृत बँका, ग्रामीण बँका, भूविकास बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, व्यापारी बँका, नागरी सहकारी बँका, राज्य सहकारी बँक यांचे सेवेतील अधिकारी दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेले सेवानिवृत्त अधिकारी असल्यास)

१. नियम वयोमानान्वये / ऐच्छिक सेवानिवृत्तीचा दिनांक :-
२. निवृत्ती वेळी धारण केलेले पद व कार्यालय :-
३. सेवानिवृत्ती आदेश जावक क्र. व दिनांक :-

-----------------------------------------

**ब) प्रॅक्टीसिंग ॲडव्होकेटस् असल्यास :-**

i) शैक्षणिक अर्हता :- ---------------------------------------

ii) (सनद) बार कौन्सील येथे नोंदणीचा क्रमांक व दि. :- ---------------------------------------

**क) सनदी लेखापाल / ICWA असल्यास :-**

i) शैक्षणिक अर्हता : पदवी प्रमाणपत्र

ii) व्यावसायीक अर्हता : एल.एल.बी./एल.एल.एम./सी.ए./आय.सी.डब्ल्यू.ए. सनद प्रमाणपत्र.

iii) सेवानिवृत्तीचा आदेश

iv) सनद (बार कौन्सिल), चाटर्ड अकौंटंट, कॉस्ट अकौंटंट यांचे सक्षम प्राधिकाऱ्याकडील नोंदणीचे प्रमाणपत्राची प्रत)

v) सर्व माहिती व विवरण सत्य व अचूक असल्याचे खालीलप्रमाणे प्रतिज्ञापत्र.

## स्वयंघोषीत प्रतिज्ञापन

मी ---------------------------------------------------------------------प्रतिज्ञापन लिहून देतो की,

१. माझ्यावर कोणत्याही स्वरुपाचे गुन्हे दाखल नाहीत.
२. मी शासकीय सेवानिवृत्त अधिकारी असून माझी कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू नाही तसेच सेवेत माझ्यावर कोणताही ठपका ठेवलेला नाही. (लागू असल्यास)
३. मी शारीरीक व मानसिक आरोग्याच्या दृष्टीने सक्षम आहे.
४. माझी सहकार खात्याने / इतर कोणत्याही प्राधिकरणाने काळया यादीमध्ये (Black List) समावेश केलेला नाही.
५. मी महाराष्ट्र राज्यातील रहिवासी आहे.
६. मी ज्या संस्थेचे लवाद म्हणून काम करेल, त्या संस्थेशी माझे हितसंबंध नाहीत.

वरील लवाद नामतालिकेसाठी स्वयंघोषीत प्रतिज्ञापनातील १ ते ६ मुद्दे हे सत्य असून त्यामध्ये काही खोटे अढळल्यास होणाऱ्या परिणामास व कारवाईस मी (खाली सही करणार) पात्र राहील.

**स्थळ :-**

**दिनांक :-**

अर्जदाराची स्वाक्षरी-----------------

नाव :

(अर्जासोबत अर्हतेमध्ये नमूद केल्याप्रमाणे आवश्यक त्या कागदपत्रांच्या स्वसाक्षांकीत (Self attested) प्रती जोडण्यात याव्यात)

***